# मेट्रो ३ डब्यांची निर्मिती भारतातच



**मुंबई** : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने मेक इन इंडिया कंत्राटाच्या निविदा प्रक्रियेनुसार ऑलस्तोम ट्रान्सपोर्ट इंडिया लिमिटेड आणि ऑलस्तोम ट्रान्सपोर्ट एस ए फ्रान्स या संयुक्त कंपनीला मेट्रो ३ च्या २४८ मेट्रो डब्यांच्या निर्मितीसाठी नियुक्त केले आहे. जायकाच्या मान्यतेनंतरच हे कंत्राट देण्यात आले आहे. खरेदी प्रक्रियेच्या कायदेशीर नियम, अटींची योग्य प्रकारे पूर्तता करूनच ही प्रक्रिया राबवण्यात आली आहे.

डिझाईन, निर्मिती, पुरवठा, मांडणी, चाचणी आणि प्रकल्पाची प्रत्यक्ष सुरुवात या कामांचा कंत्राटात समावेश असून ८ डब्यांच्या ३१ ट्रेन अशी रचना आहे. १८० मी. लांबी असलेल्या डब्यांची क्षमता ३०० प्रवासी प्रति डबा आणि पूर्ण ट्रेनची एकूण क्षमता २३५० प्रवाशांची आहे. आरामदायी आसनव्यवस्था ही या डब्यांची खासियत आहे. ट्रेन २५ केव्ही एसी ट्रॅक्शन विद्युत पुरवठ्यावर कार्यरत होणार आहे. प्रत्येक बाजूला ४ दरवाजे अशी व्यवस्था असून डबे स्टेनलेस स्टील धातूचे आहेत. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. अधिकाधिक प्रवासी आणि त्यानुसार ट्रेनची संख्या हे आव्हान आहे. त्यासाठी उत्तम दर्जाचे आणि प्रवाशांच्या दृष्टीने सुरक्षित डबे ही महत्त्वाची बाब आहे, त्यासाठी कम्युनिकेशन आधारित ट्रेन नियंत्रण प्रणाली आणि विनाचालक ट्रेन पद्धती ही योजना आहे. एमएमआरसीएलने केंद्र शासन आणि राज्य सरकार यांचे सातत्याने मिळणाऱ्या सहकार्याबाबत आभार मानले.

**डब्यांची वैशिष्ट्ये**

*▪ एलईडी प्रकाश योजना ▪ ३५ वर्षे इतक्या कालावधीत ट्रेन बिनतक्रार कार्यरत ▪ उत्तम वेग नियंत्रण, वीज बचतीसाठी ७५ टक्के मोटराइझेशन ▪ वातानुकूल नियंत्रण ▪ प्रशस्त एलईडी स्क्रीनवर खास प्रवाशांसाठी दरवाजाच्या कार्यप्रणालीचे प्रदर्शन ▪ प्रवाशांच्या माहितीसाठी डिजिटल मार्ग नकाशा ▪ मदत केंद्र*